ये. बैस बाबा. मज सांग सारें. ८१
तुला त्रास झाला कुठें ? काय ? केव्हां ?
कुठें म्लेंछ आले ? कसें काय तेव्हां !
अरे सांग. ऐकूं मला दे. सख्यारे !
तुला दुःख जें। तें मला दुःख सारें." ८२
ह्मणे शूर तेव्हां. "बये हे ! मला गे !
जरा त्रास नाहीं; वनीं गोड लागे.
निघालों, तसा मौज मारीत आलों.
तुला त्रास होईल, मी ह्मास भ्यालों." ८३
माता ह्मणे "रे ! तुज काय सांगूं !
धांवे पिलाजी. ह्मण वायु पंगू.
चाले पिलाजी गरुडा समान.
वाऱ्या पुढें कीं उडतें विमान. ८४
खांद्यावरी मी बसतां निघाला.
चाले पुढें धांवत. शंभु भ्याला.
गेली नदी; डोंगर; माळ गेला.
तो रांगण्याला मग शूर आला. ८५
जी मौज, जो रंग, दिसे वनांत;
पाहून भारी रमलें मनांत.
आहे मराठा बहु योग्य हा, रे.
मारील हा म्लेंछ रणांत सारे." ८६

बोले बहिर्जी—"लढलोंत शूर.
हे मांग आहेत पहा ! समोर. १

ती नूरजानीच मनीच यांची.
हे लूट देती मिळवून साची." ८७
ह्मणे थोर राजा. " बहिर्जी ! पुरेरे !
असें बोलणें खास मूर्खत्व कोरें.
स्वतां सांगशी थोरवी मित्र, पाहा !
स्वतांला स्वतां वर्णणें हें. अहाहा ! ८८

उठे तो पिलाजी ह्मणे. " काय राया !
धजे कृत्य हें नूरजानी कराया ?
जरी मी पिलाजी असे, सुज्ञ राज !
तरी आणतों नूरजानीस आज.८९
पायापुढें या करतों उभी कीं.
ती नूरजानी. मग तूं विलोकीं."
केली प्रतिज्ञा; उठला पिलाजी;
गेला तसा शूर मनांत राजी. १९०

शिवाजी ह्मणे. " तोफ झाली अहारे !
मराठे महा शूर येतील सारे.
पहा ! खूण ही देशपांड्यास झाली.
अरे शूर योद्ध्या ! पुरे. मौज केली. ९१
निबे एकटा शूर योद्धा लढाया;
मुसल्मान फौजेस त्या त्रासवाया.
अरे ! ये. मुरारी ! गड्या ! शूर वीर.
तुझ्या मस्तकीं लागला काय वार ! ९२

अरे ! युद्ध झालें. कुणी शौर्य केलें ?
कुठें देशपांडे पुढें आज गेले ?
मला सांग हें सर्व. योद्ध्या मुरारी !
कुठें म्लेंछ सेना ? कथा बोल सारी. ” ९३

बोले मुरारी. “ लढलोंच भारी,
गांठून हा डोंगर, ही कठारी.
तो म्लेंछ आला खवळून तेथें;
झालें महा युद्ध रणांत जेथें. ९४
बाजूस ह्या डोंगर थोर आहे.
बाजूस त्या लांबट खिंड राहे.
मध्यें दुतर्फा खडपें निघालीं.
ती चिंचुळी वाट समोर आली. १९५
पुढें टेकडी उंच होती समोर.
जिथें राज ! झाला चमत्कार थोर.
जसा धांव धांवून तो म्लेंछ आला;
तसा वीर कोणी तिथेंरे ! निघाला. ९६
धरी तीन शस्त्रें; पडे तेज त्याचें;
रणीं वीर हा रे! गरारांच नाचे.
उडे एक, तेव्हां दुजें शस्त्र फेंकी.
दुजें चालिलें, तों तिजें शस्त्र टाकी. ९७
अशी मौज मागें; पुढें म्लेंछ झाले.
तसा देशपांड्या मराठ्यांस बोले.

'करा आठ टोळ्या. रचा ओळ आतां.
लढा कीं मरा. शूर व्यालीच माता. ९८
तर्वार हातीं रणशूर वाहे.
ती पांचवीला पुजती. पहा हें.
लग्नांत तर्वारच मुख्य राहे.
धाटी मराठी मुळचीच आहे. ९९
ही बेतली कत्तल, आणिबाणी.
आहे मराठी बहुशूर बाणी.
होतां पुढें कोण ? चला. निघा या.
धांवा रणीं, लौकिक गाजवाया. २००

जसा थांबला, थोर हर्हर् उडाला.
मराया, जिताया, मराठा निघाला.
'पुढें मी, पुढें मीहि, मीमी उडाली.
भरे शौर्य पोटीं, उठे एक टोळी.२०१
सर्वे देशपांडे. पहा फेर केली.
मुसल्मान आले भिडाभीड झाली.
उडे एक तों रंग. ते म्लेंछ दंग.
मधें फार गर्दी. मराठे हि गुंग. २०२
मराठे च थोडे किती म्लेंछ होते !
खुटे वाट त्यांची. मराठे सभोंते.
तसे गर्क झाले मुसल्मान वीर.
पुढें हुल्ल केली रणीं ह्या समोर. २०२
योद्धे मराठे घुसले रणांत.

खंडूके विरांचे पडले क्षणांत.
तापे मराठा. मग धीर नाहीं.

तों देशपांडे ह्मणतात—'पाहीं. २०४
हे वीस गेले लढणार वीर.
तो स्वर्ग त्याना रमणीय फार.
ती टेंकडी दूर समोर पाहां.
तो शूर कोणी लढतो. अहाहा ! २०५
तो तीन शस्त्रें फिरवी विचित्र.
तो देव कोणी न मनुष्यपुत्र.
धांवा. चला. रंग करा रणीं या.
योद्धे महा शूर तुह्मी लढा. या.' २०६

धांवे मुसल्मान रणीं समोर.
युद्धीं मराठे पडलेत वीर.
तो त्वेष, तो राग, चिढून गेले.
तों टेंकडींतून कडाड झाले. २०७
घुसे देव तो शूर या म्लेंछ लोकीं.
जसें चक्र. पाहां ! तसें शस्त्र फेंकी.
अहा ! तीन शस्त्रें गरारां उडालीं.
किती म्लेंछ मेले ! अशी मौज झाली. २०८
आहे मधें चंद्र. खळें सभोंती.
बाकी अभाळीं ढग दाट येती.
तो चंद्र शोभे किरणांत भारी.

हा देवयोद्धा रण तेंवि मारी. २०९
मराठ्या विरांना चमत्कार वाटे.
पुढें तापले शूर योद्धे झपाटे.,
निघाले रणीं धांव धांवून. राजा !
मनीं त्वेष आला पुन्हा शूर ताजा. २१०
दुजी शूर टोळी निघाली समोर.

जसे बोलले देशपांडे हुशार.
'चला. या. रणीं सूड घ्याया विरांचा.
धडें बोलतीं घोर हो ! होच वाचा. २११
चला. या रचा कोट. लावा तडाका.
रणीं लोळती वीर ऐकाल हाका.'

पुढें बांधती कोट ते शूर लोक;
रणीं धांव घेती. उठे एक हाक. २१२
मुसांडी दिली. म्लेंछ तो दंग झाला.
तसा टेकडींतून योद्धा निघाला.
जणों चाररे ! हात कीं पंख होते.
सुटे शस्त्र त्याचें दुतर्फा सभोतें. २१३
मधें देवयोद्धा. टिकेनाच कोणी. *
गळे म्लेंछ तो; पाझरे जेंवि लोणी.
पळे म्लेंछ तेव्हां, जणों काय पाणी.
असा देवयोद्धा हि शत्रूंस ताणी. १४
पडे सर्व जेव्हां दुजी शूर टोळी.

मराठा तसा तो जरा पाय गाळी.
पुढें युद्ध चाले खडेजंग. राया !
सर्वं देशपांड्या निघाला लढाया. १५
जसे शूर हे सर्व योद्धे निघाले;

पुढें शूर तर्वार पेलून बोले.
' जगे कीं मराठा. जगे म्लेंछ काय ?
करावें कुणी राज्य ? योजा उपाय. १६
धांवा रणीं. पाचर शूर बांधा.
मागें सहा, पांच, मिळून सांधा.
चारी पुढें तीन, अखेर एक.
युद्धीं घुसा तीक्ष्ण करून टोंक. १७
जो शौर्य दावी, यश त्यास येतें.
मारा मुसल्मान. सुकीर्ति होते.
तो भीष्म; तो द्रोण, मनांत आणा.
हें युद्ध नेतें गगनास जाणां.' १८

निघाले मराठे; मनीं काव्हले ते;
रणीं धांवले, तों नवें शौर्य येतें.
उडी टाकली; एक गर्दीच केली;
तसी म्लेंछसेना भयाभीत झाली. २१९
जसा पिंजतो झाड गांठाळ सोट.
तसे म्लेंछ झाले. उठे एक लोट.
पुढें ते मराठे सरारून गेले.

पुन्हा काव्ह काव्हून ते शत्रु आले. २२०

घनूचक्री ही थोर राजा ! उडाली.
ठोकाठोकी आज भारीच झाली.
धांवे योद्धा तो मुसल्मान सारा.
मागें झाला रे ! मराठा झरारा. २१

उरे देशपांड्या रणीं एकटा, हा.
पुढं धांव धांवून चाले. अहाहा !
जसा म्लेंछ कोणी धरी हात त्याचा;
तसा देशपांड्या हणी वार साचा. २२

तेव्हां मुसल्मान फिरे उडून,
डोंकें तळीं, पाय वरी करून.
तो वार त्याचा चुकला जसा कीं,
तों देशपांड्या दुसऱ्यास फेंकी. २३

हें शौर्य त्याचें. दिसला मराठा.
तों पेटला हा परभूहि हट्टा.

बोले. ' अरे म्लेंछ ! उभा जरासा.
तूं शूर योद्धा दिसतोस खासा. २४

होशी मराठा ? लढशी कुठेंरे ?
किंवा खरा म्लेंछचि ? बोल सारें.
शत्रूंत हें शौर्य नसे. पहारे !
कित्ता मिळाला. गुरु कोणरेरे ?' २२५

तसा म्लेंच्छ बोले'मुळीं मी मराठा.

पुढें म्लेंच्छ झालों. असे हाच तंटा.
मराठा कुणी शूर पोवार होता.
महाकीर्ति त्याची. असे थोर सत्ता. २२६
होता मराठा रणशूर वीर.
हातांत त्याच्या बहु देश थोर.
श्रीमंत तो पूर्वज कीं, कथा ही.
हें बोलणें ऐक ! न चित्त साही. २२७
तों युद्ध माजे. जगदीश कोपे.
चाले मराठा. मन फार तापे.
झाला पुढें मोड. कुटुंब गेलें.
स्वाधीन झालों. मग शत्रु आले. २२८
तेव्हांच पोवार गुलाम केले.
आह्मास सर्वांस धरून नेलें.
केला मुसलमान पुढें मलारे !
ते धर्म आतां करतोंच सारे. २२९
तरी मी मराठा. मराठा खराटा,
पहा ! झाडणाराच देऊळ कटा.'

असें बोलतां म्लेंच्छ तो हात जोडी;
म्हणे-'दान देंगा ! मला आज सोडीं. २३०
मी.मित्र. मी दास. उभा पुढें हा.
आज्ञा मला दे लढण्यास. पाहा !'
तों देशपांडे म्हणती विराला—
'पाडीं मुसलमान हणून टोला.' २३१

तसे ते मुसल्मान धांवून आले.
हणी शत्रु शत्रूंस. तों ते म्हणाले—
‘ अरे ! बंड झालें. पहा ही फितूरी.
लढे हा मुसलमान. आम्हास मारी. २३२.
रणीं एक कल्होळ. झाला पसारा.
तसा देशपांड्या फिरे पाठमोरा.
दुजी सर्व टोळी रणीं या बुडाली.
मराठ्या विरांनीं तसी धांव केली. २३३

तों देशपांडे म्हणती विराना—
‘ हे म्लेंच्छ आहेत रणांत नाना.
आहीं मराठे लढणार शूर.
दावा चला शैार्य करून पूर. २३४
करी देवयोद्धा पहां ! युद्ध एथें.
रणीं देव आला. उणें काय तेथें ?
पुढें दूर त्या टेकडीला पहां. रे !
किती तेज फांके ! पहा शौर्य सारें. २३५
चला. या. रचा चक्र, हे शूर वीर !
चिचुंद्री सुटे तेंवि धांवा हुशार.,

मराठे तसे एक रे ! चक्र झाले;
गरारा झरारा रणीं या निघाले. २३६
तसा फाजिला त्रासला म्लेंच्छ भारी;
पुढें धांव केली; ध्वजाला उभारी;

जना त्वेष सबी; स्वतां ढौल लावी;
म्हणे तो–'पहारे, पहा. कीर्ति व्हावी. २३७
मराठे रणीं धांव धांवून आले.
कसेरे! मुसल्मान पंगू निघाले?
मराठे दहा वीस आहेत एथें;
हजारो मुसल्मान हे वीर जेथें. २३८
न्या टेकडींतून निघे मराठा;
धांवे लढाया पकडून सोटा;
टाकी उडी शूर रणांत जेव्हां;
मागें कसे हो! पळतांच तेव्हां. २३९
धांवा. चला. वीर! लढाल कांहीं?
माझ्या मनीं धीर मुळींच नाहीं.
ही वेळ खोटी. जळलों मनांत.
हा मोड खासा. पण ती रणांत!' २४०

पुढें बोलतांना मधें थांबला तो.
नसे नूरजानी. मनीं दंग होतो.
' सुखाचे धनी हे! अहा नूरजानी.
कसी आज गेलीस. जावो जवानी. २४१
तुझ्यागे! मुळें वीर मी मूर्ख झालों.
तरी तूंच गेलीस. हा खास मेलों.
सखेगे! गडेगे! कुठें माण गेला?
तुझ्या वीण मारब्ध! हा त्रास झाला.' २४२
मनीं बोलला हें. पुढें काव्हलाहे.

मुसलमान लोकां ह्मणे ' युद्ध आहे;
मराठ्या विराना धरा. ठार मारा.
कुणी हेर आला. फिरे पाठमोरा. २४३
तोहेर—' भेटे मज नूरजानी.
चाले मजेनें रमणीय रानीं.
तेव्हां तिलारे ! जपणार आतां.
योद्धा मराठा रणशूर होता. २४४
त्याच्या सवें ती निघती खुशाल.
अंगावरीरे ! खुलती हि शाल.
ती हास्य चर्या करती जराशी.
डोळे मराठा मग फार वाशी. २४५
रानांत दोघे जण हे निघाले.
ह्या टेकडीच्या लवणांत गेले.
योद्धा मराठा लढणार शूर.
देखे मला; तीर हणी हुशार. २४६
तसा मी निघालों. रणीं आज आलों.
पहातां असें युद्ध, रे ! फार भ्यालों '
मराठा पिलाजी हरी नूरजानी.
असी फौज सारी मनीं आज मानी. २४७
तों फाजिला हें उसळून बोले.—
ह्या टेकडीचे तुकडेच झाले.
धांवा मुसलमान ! चढा. चला. या.
आला पिलाजी. धजतो लढाया ! २४८
फिरा पाठमोरे. चढा टेकडी ही.

धरा तो पिलाजी. करा शौर्य कांहीं.
मुसल्मान योद्धे ! तरारो निशाण.
चला. धांव मारा; जसा काय बाण.' २४९

तेव्हां मुसल्मान फिरे झरारा.
त्या टेकडीचा मग रोंक सारा.
धांवे मराठा, जणु काय वारा.
त्या टेकडीचा दिसतो पसारा. २५०
लढे एकटा देवयोद्धा हुशार.
चढाओढ. ते म्लेंच्छ होते हजार.
सुऱ्या तीक्ष्ण साऱ्या शरीरास बांधी;
पहा ! कोपरालाहि तर्वार सांधी; २५१
तर्वार योद्धा गुडघ्यांस लावी;
लोका निराळें मग शौर्य दावी.
ते म्लेंच्छ झाले पळण्यांत गुंग.
मागें मराठे लढण्यांत दंग. २५२

तों देशपांडे ह्मणती विराना.
'हा देवयोद्धा. गुण काय नाना !
आतां पहाहें लढणें विचित्र !
झाला खरा हा नमण्यास पात्र.' २५३

तेव्हां मराठे ह्मणतात सारे.
'हे देवयोद्ध्या ! यश दे. मुरारे !

तूं देव. तूं थोर. परेश तूं. रे !
तूं राज्य देशी; हरशी. मुरारे ! २५४
असें बोलतां, थोर हर्हर् उडाला.
मुसल्मान सारा पुढें लाल झाला.
निघे टेकडींतून ती आग जेव्हां,
फिरे तो मुसल्मान मागेंच तेव्हां. २५५
निघे म्लेंच्छ तो मूळजागीं लढाया.
मराठे तिथें सिद्ध होते हणाया.
पुन्हा युद्ध चाले. पुन्हा वीर आले.
पुन्हा शौर्य केलें. पुन्हा रंग झाले. २५६
मुसल्मान आले. किती त्वेष अंगीं !
मराया निघाले अशा ह्या प्रसंगीं.
पुढें धांव केली. उठे म्लेंच्छ सेना.
टिकेना मराठा. असें म्लेंच्छ नाना. २५७

तसे देशपांडे विराना ह्मणाले.
' पहा ! म्लेंच्छ लोकां नवें शौर्य आलें.
तुह्मी हे तरी शूर आहां हुशार.
करा युक्ति, आतां असारे ! तयार. २५८
सरा पाठिमागें. दडा सर्व शूर.
करा शांत सारें. कशाला उशीर ?
पळा.रे ! निघा.रे ! करा खिंड खालीं.
पुढें म्लेंच्छ सेना ह्मणे. वाट झाली. २५९
तो शत्रु खिंडींत शिरेल जेव्हां.

मानी; मराठे नसतीच तेव्हां.
'हदत्त' बोला, उडवून धूळ.
'पाडां मुसल्मान पुढें समूळ. !' २६०

गेले मराठे खडपांत कोठें.
खिडींत बाकी उरलेत गोटे.
तो वाघ जैसा हडदांत जातो
कोठें दिसेना; क्षण गप्प होतो. २६१
गेले मराठे. मग थांग नाहीं.

तों फाजिला व्यर्थच गर्व वाही—
'गेले मराठे, पळण्यांत शूर.
ही वाट आहे सरळी समोर. २६२
खिडींत कोणी उरला नसे रे!
धांवा. कसें युद्ध करील वारें ?
आतां नसे त्रास, पुढें चला या.
नाहीं रणीं आज कुणी लढाया.' २६३

तेव्हां मुसल्मान हुशार झाले.
तो फाजिला म्लेंच्छ मधून चाले.
मोठी मनीं हौस. रणीं खुशाले.
मानी पुढें-युद्ध समाप्त झालें. २६४
ते म्लेंच्छ तेव्हां रमतात भारी.
चाले छबीना. न कळे हुशारी.

तो फाजिलां वीर ह्मणे मनांत.
'मी मौज केलीच खरी रणांत. २६५
अरेः बादशाहास सांगेन आतां.
मराठा हजारो रणीं आज होता.
पुढें धांव केली, पुढें युद्ध केलें.
तसे ते मराठेच भ्याले; पळाले. २६६
पुढें मी निघालों. सर्वे फौज सारी.
किती शौर्य माझें ! भिती शत्रु भारी.
ह्मणे बादशाहा—भला फाजिला तूं—
पुढें कीर्ति माझी. न कांहींच किंतू.' २६७
असा हा मनीं गुंग. चाले पुढें तो.
तसा ' दत्त हेदत्त 'आवाज होतो.
अभाळीं भरारा उडालीच धूळ.
तशी झांकली खिंड सारी समूळ. २६८
दिसेना मुसल्मान किंवा मराठा.
सुटे तो मराठा खडेजंग सोटा.
उडे फेपरी. तों मुसल्मान भ्याला.
मराठा मराया रणीं सिद्ध झाला. २६९
धुमाळी असी सारखी चालली कीं.
नसे धीर कांहीं पहा ! म्लेंच्छ लोकीं.
' हें दत्त हेदत्त ' ह्मणे मराठा.
तलवार चाले. रणशूर सोटा. २७०
दिन् दिन् असें ते ह्मणतात जेव्हां;
झाला मराठा मग लाल तेव्हां.

ठोका कुटा ही उठली अरोळी.
तो रंग, तें रक्त, मनास जाळी. २७१
कल्होळ मोठा उठला रणांत.
भारी मुसल्मान पडे क्षणांत.
ते शत्रु मागें हटतात तों तों.
योद्धा मराठा चवताळतो तो. २७२
तेव्हां रणीं दंगल एक झाली.
मोठी पुढें कत्तलरे ! उडाली.
योद्ध्यास योद्धा भिडला कठोर.
चाले असी चकमक घोर. शूर ! २७३
ते म्लेंच्छ आतां हटतात. राया !
जेव्हां मराठे उठती मराया.
ते शत्रु सारे निघतात दूर.
युद्धीं मराठे ठरले हुशार. २७४
ते देशपांडे घुसले रणांत.
तें शौर्य, चातुर्य बुडे क्षणांत.

तों राय बोले- " लढले मराठे.
ते देशपांडे पडलेत कोठें ! " २७५
पुढें स्तब्ध होतां दिसे लाल भारी.

कथा शूर चालू करी तों मुरारी.
" अहा ! देशपांड्यास जों वार लागे;
हटे तों मुसल्मान तेव्हांच मागें. २७६

तों देशपांडे म्हणतात वीर—
' हा मृत्यु आला. मग कां उशीर ?
आहे तयारी. क्षण एक राहां.
आहे सुखी कां नृप आज पाहां ' २७७.
अंगावरी वार, सजे सुवीर.
पोटांत त्याच्या बसली कटार.
डोळे जरी लाल, मनांत शांति.
तोंडा वरी सोज्वळ काय कांति ! २७८
तर्वार हातीं; रणशूर आहे.
डाव्या कुशीलाच पडून राहे.
धारिष्ट, चातुर्य, रणांत मोठें.
सारे सभोंती जमले मराठे. २७९

तो शूर बोले मग. सुज्ञ राया !
' आनंद वाटे मजहो ! मराया.
युद्धीं विराना यश हें मिळालें.
रे! दुःख माझें सगळें निवालें. २८०
सुखी शूर योद्धा महाराज आहे.
पहा ! तोफ झाली. ' पुढें स्तब्ध राहे.
तसा प्राण सोडी, महाराज! पाहां !
तसा वीर सारा मनीं दंग. हा हा !" २८
राजा म्हणे " रे ! बहु दुःख सांचे—
आहे कुठें शूर शरीर त्याचें ? "
बोले मुरारी "–उठले मराठे.

हातांत घेतात शरीर मोठें. २८२
छबीना जणों तो. सर्वे वीस वीर.
मनीं शौर्य गाजे; निघाले समोर.
न भ्याले लढाया; न भ्याले मराया;
उभे जाळण्याला तसे सिद्ध. राया ! ”
उगा तो मुरारी. बसे स्तब्ध राय.
मनीं फार त्याच्या उठे हाय हाय.
दिसे वीर गंभीर. डोळ्यांस झांकी.
महाराज तों थोर उच्छ्वास टाकी.२८४
ते वीस योद्धे रणशूर आले.
अंगावरी वार; मनीं निवाले.
हातांत तर्वार, समोर झाले.
पाहून त्याना मग राय बोले. २८५

“ हें युद्ध केलेंत रणांत मोठें.
आश्चर्य हें काय ! तुह्मी मराठे.
ते देशपांडे पडले रणांत.
तो वाघ गेला. पिळलों मनांत. २८६
ती भक्ति, तें शौर्य, विचित्र होतें.
हे देशपांडे दिसतात रे ! ते.
स्वर्गी विमानांत बसून जाती.
ती शूर तर्वार धरून हातीं. २८७
ही कीर्ति रे ! सोज्वळ, थोर ज्याची.
शत्रूंस जो शूर रणांत जांची.

भ्याला न जा, मृत्युसमोर झाला.
हें दुःख पाहा ! न रुचेल त्याला. २८८
टाकूं चला दुःख निघूं लढाया.
त्या देशपांड्यास मनीं धरा या.
रे ! मृत्यु आला. मग देह गेला.
तो प्राण राहे मग भोगण्याला. २८९
हा प्राण बाबा ! चिरकाल राहे.
रे ! सौख्य कीं दुःख पुढेंच आहे.
जो देशकल्याण झटे कराया;
ज्याला नसे भीति रणीं मराया; २९०
तो थोर, तो साधु. मनांत आणां.
ह्या देशपांड्यास असाच जाणां.
कित्ता गड्यानो ! गिरवा जपून.
एकाभरें ! चित्त अधीं करून. २९१
हे शूर योद्ध्या ! वळणें सदा दे.
बाणा तुझा कीं स्वजनांत नांदे.
तूं शूर, तूं वीर, मनांत येशी.
योद्ध्या ! तुझें शौर्य रणास घाशी. २९२
तूं वीर युद्धीं पडलास कां रे ?
तूं शूर योद्धा.—ह्मणतात सारे.
सामर्थ्य होतें रण जिंकण्याला.
सामर्थ्य नाहीं तनु राखण्याला. २९३
रणीं शूर देशी मराठ्यांस कित्ता,

मराया जिताया स्वतां सिद्ध होतां.
स्वतां दाविशी मार्ग आह्मा विराना.
स्वतां शूर देशी रणीं जीवदाना. २९४
किती शत्रु आले ! न जाशील आर्या.
स्वतां सिद्ध झालास तूं रे ! मराया.
मराठ्या विराना तुझें शौर्य यावें.
तुझें शूर ! धारिष्ठ त्याना कळावें " २९५

असें बोलतां वीर ते सिद्ध झाले.
मराया, जिताया, रणीं ते निघाले.
ह्मणूं लागले कीं " करूं युद्ध. राय !
रुचे शौर्य आह्मां. तुझे साक्ष पाय " २९६
तसा शांत गंभीर राजाहि झाला.
मिटी शूर डोळे, ह्मणे तो स्वतांला—
" अहा देशपांडे ! करा शौर्य आतां.
रणीं शूर या. हो ! रणीं शत्रु येतां. " २९७

भाग ५ समाप्त.

राजा शिवाजी.

भाग ६ वा.

जमे दाट झाडी. दिसे गच्च सारें.
उठे नाद "रोंरों" सुटे फार वारें.
झुले सर्व झाडी. हले सर्व रान.
उडे धूळ तेव्हां; उठे कीं तुफान. १
तों मोडती उंच भयाण झाडें.
तो वायुचा वेग. अरण्य वेडें.
तों काव्हले डोंगर. वायु माजे.
रानांत भारी पडसाद गाजे. २
फांद्या फांद्यांला झोडती; नाद होती.
शेंडे शेंड्यांला घासती; त्रास देती.
झाडा झाडांची चालली एक कुस्ती.
झोंबा झोंबी ती माजली फार स्वस्ती. ३
तों त्रासतां थोर घुमे समुद्र.
घेती जणोंकीं अवतार रुद्र.
लाटांस लाटा भिडती विचित्र.
पाणी उडे; घोर खरें चरित्र. ४
तों लाट येतां खडकांस लागे.
" घों घों " असा नाद वनांत गुंगे.
ही रांगण्याला धडके अरोळी ;
तों वीज भारी चमके अभाळीं. ५

झाली असे सांज. अभ्राळ रंगे.
पूर्वेस आले ढग. तेज भंगे.
तों नागमोडी बहु वीज दावी.
तो वेग, ती मौज, स्वतां पहावी. ६
पुढें एक गर्दी उठे कीं अभाळीं.
"कडाडा घडाडा" सुटे ही धुमाळी.
चळे सृष्टि सारी, जणों वायु झाला.
जणों काय वेताळ अंगांत आला. ७
तसीं श्वापदें डोंगरीं फार भ्यालीं.
उठे, वाघ गर्जे. अरोळी उडाली.
खिसूं लागतां वानरें, दंग झालीं.
चढे उंच कीं घार तेव्हां अभाळीं. ८
असा रंग चाले. वनीं झाड आहे.
शिवाजी तिथें तों उभा स्वस्त राहे.
नसे भीति. तो शूर देशाभिमानी.
पुढे पाहतां सुज्ञ, ती मौज मानी. ९
त्या लोळती कीं चिमण्या धुळींत.
लावी किती लक्ष ! खुले मनांत.
मौजेंत राजा मग गुंग झाला;

तेव्हां कुणी हेर समोर आला. १०
म्हणे" हे महाराज ! हा हेर. पाहा !
लढाई कराया निघे बादशाहा.
सर्वे फौज मोठी; पन्हाळ्यास गांठी;

मनीं सूड घोटी ; भरे राग पोटीं; ११
पुढें लोक रेटी ; हणी दोर पाठीं;
असा देश वांटी; जमे घोर दाटी;
धरी दुष्ट वेठी; मुसल्मान थाटी ;
करी फार अट्टी; बुडावी मराठी. १२
गेला पन्हाळा. करवीर गेलें.
गेला पहा ! देश. कन्हाड गेलें.
रे ! दोन हे धांवत हेर आले !
सांगा गड्यानो मग काय झालें." १३

तो शूर राजा ह्मणतो पुढें कीं,
"तो शत्रु लोकांस उगीच ठोकी.
तूं सांग हीसर्व कथा अधीरे.
हे क्लेश होती स्वजनास सारे. १४

निघे बादशाहा. निघे फौज भारी.
लुटी देश सारा मराठ्यांस मारी.
उरे रांगणा हा मराठ्यां जनाना.
पुढें काय आतां ! असे म्लेंच्छ नाना. १५
ती बादशाही चढवी कमान;
देती मराठे मग तीस मान.
सारा पहा ! देश नमून राहे.
तो बादशाहा शिरजोर आहे." १६

उच्छ्वास मोठा मग राय टाकी;
ते लाल डोळे फिरवी; विलोकी.
ओठांस चावीत मनांत आणीः—
"नाहीं मराठा रणशूर कोणी. १७

करूं ह्या लढाया. ह्मणूं शत्रु हा कीं.
सुटे पोळ मोठा; जनां सर्व ठोकी.
तरी ही दशा आज झाली खरी. हा!
मराठ्यां जनांला नसे ठाव पाह्य!" १८

मनीं घोळतां घोळतां शूर चाले.
"कुठें शत्रु आहे ह्मणूं त्यास," बोले.
चढे त्वेष अंगीं; जळे अग्नि जैसा,
पुढें शूर भासे; दिसे तप्त ऐसा. १९

झाला दुजाहेर समोर आतां.
"देतें महाराज मुधोळ गोता.
आहे पहा! सैन्य तयार जेव्हां,
साहाय्य देणार कुणास तेव्हां! २०
ते शत्रु, हे घोरपडे मिळाले.
दोघे पहा! ते लढण्यास आले."

उच्छ्वास मोठा मग राय टाकी.
डोळे किती लाल करून फांकी! २१
चिडे शूर भारी. मनीं शत्रु आणी.
सुटे त्रास त्रासून डोळ्यांस पाणी.

ह्मणे "हे मराठे मराठ्यांस वैरी.
पुढें यास्वदेशा कसा देव तारी !" २२

तिजा हेर तेव्हांच झाला समोर.
महाराज ! झाला मला फार घोर.
निघालों बघाया, कुठें काय चाले ?
पुढें कैद झालों. जिथें शत्रु आले. २३
झालों मुसल्मान; गुलाम झालों;
झालों पुढें दास, घरांत गेलों.
तों खानबिब्बी मज बोलली ती.
येरे गुलामा ! बस, टाक भीति; २४
विश्वास माझावर फार झाला.
तो खानसाहेब तिथें हि आला.
तेव्हां पहा ! खान घरीं ह्मणाला.
'हा बादशाहा कपटी निघाला. २५
हणूं त्यास, आणूं पहा जेर आतां.
दमे बादशाहा, कुठें बंड होतां !
कुणी शूर जाऊन कर्नाटकाला.
करा बंड मोठें. करा एक काला.' २६
तसें बंड राजा ! तिथें घोर केलें.
.पुढें खान बोले. 'पहा ! ठीक झालें.'
तसे दोन जासूद तेव्हांच आले.
पहा ! बादशाहाच पत्रांत बोले. २७
'अरे खान ! येये, नको राग, बाबा. !

असूंदे तुझा आमचा रे! घरोबा'.
पुढें खान बोले 'नको पत्र; खोटें.
मला गोड लागे पंहा! बंड मोठें'. २८
असें बोलला, तों पुढें सिद्ध झाला.
निघाला; महाराज ! कर्नाटकाला."

तसा शूर राजा जरा शांत झाला.
पुढें कोकणांतून हा हेर आला. २९
"सावंत, राजा ! उठती लढाया.
त्या बादशाहास सहाय व्हाया.
केली तयारी; तजवीज चाले.
आले पहा ! ते रण सिद्ध झाले. ३०
वाडी, मुधोळांत असे तयारी.
दोघे मिळाले बळवान वैरी."

तसा शूर राजा ह्मणे "रे! बहिर्जी!
सवें कोण येतां ! चला आज गाजी !".
धरी शस्त्र हातीं, महाराज चाले.
तसे शूर योद्धे मराठे निघाले.
दहा वीस होते, तरी सिद्ध झाले.
पुढें पाय ठेवी. महाराज बोले:— ३२
"सावंत, रे ! घोरपडे निघाले.
भावांत भावांतच युद्ध चाले.
सारे मराठे. ममता करावी.

तर्वार त्यांच्यावर कां धरावी ! ३३
खरी गोष्ट आहे. खरी रीति आहे.
तरी सिद्ध झाले लढायास कां हे !
मुसल्मान लोकांस साहाय्य देती.
मराठी बुडावी, असे सिद्ध होती. ३४
मराठी तरीही कशाला असावी !
असें बोलतां, रीति त्यांनीं पहावी.
घडे त्रास साऱ्या मराठ्यां जनांना;
मुसल्मान राज्यांत दुःखेंहि नाना. ३५
मला राज्य हावें. मला सौख्य होवें.
मराठे दुजे सर्व दुःखी रहावे.
अशी वासना खास नाहीं पहा ! कीं.
मराठ्यां जनांचेंच कल्याण घोकीं. ३६
हा देह आहे क्षण राहणारा.
तो मूर्ख रे ! गौरव मानणारा.
रे ! लोककल्याण कसें करावें !
हा स्वार्थ, हें कर्म, मनीं धरावें. ३७
चला ! आज धांवूं; मुधोळास गांठूं;
चला ! दुष्ट वैरी रणीं सर्व वाटूं.
पळा; शूर हेर ! विरांना कळाया.
रणीं सिद्ध झाला शिवाजी लढाया. ३८
जरी पावसाळा, तरी वेळ आली.
मुधोळाकडे फौज आतां निघाली.
चला ! धांव मारा. नसे वेळ आतां.

निघारे. चला ऐकतां युद्ध वार्ता. " ३९

पुढें धावतां, थोर हर्हर् उडाला.
मराठा महाशूर काढून गेला.
तसा शिंग फुंकी पुढें शिंगवाला.
लढाया मराठा रणीं सिद्ध झाला. ४०
शिवाजी निघाला. ह्मणे सुज्ञमाला:—
" त्वराही किती ! घेतले युद्ध आतां.
सख्या ! काय बोलूं ? दया ईश्वराची. "
तसी सुज्ञ राणी दिसे म्लान साची. ४१
न बोले जरा; शूर राजास न्हाळी.
मनीं भीति माजे. तिला भीति जाळी.
किती गोड शोभा ! करी तोंड खालीं.
सखी ओठ काढी. पडे अश्रु गालीं. ४२
सखी कांपती. घाम आला कपाळीं.
उडे जीव भारी. तसी पाय गाळी.

ह्मणे शूर राजा - "निघालों लढाया.
नको त्रास आतां. नको दुःख वाया. ४३
कृपा ईश्वराची. तुझी थोर माया.
मिळोंदे मला आज आज्ञा निघाया. "

मराठे निघाले. वनीं चालले ते.
पडे फार पर्जन्य. पाणी सभोंतें. ४४

गेले किती डोंगर ! घोर रानें !
गेले किती डंग ! नद्या ! तुफानें !
गेले झरारा. अवकाश नाहीं.
लागे पुढें घोर अरण्य कांहीं. ४५
झाडांत झाडें अडकून जातीं.
गोटे, शिला घोर, उदंड रेती.
लागे पुढें माळ सपाट भारी.
चाले मराठा, मग धूम मारी. ४६
उलंघून गेले किती डोंगराला !
भरे वेग अंगीं; मनीं त्वेष आला.
उडी टाक, घे धांव, कीं घाल झाप,
असे ते निघाले. नसे त्यांस झोंप. ४७
सळाळा पळाले, जसा काय साप.
जरा थांबती जों भरे त्यांस धाप.
वनीं शिंग फुंकी, जिथें शिंगवाला.
मराठा कुणी शूर तेथें निघाला. ४८
ही गोष्ट गेली पसरून देशीं.
कोणी मराठे निघती उपाशीं.
आले कुणी शूर, वनांत दंग.
झाले तिथें सिद्ध; कळे प्रसंग. ४९
नको बायको, कीं नको पोर त्यांना;
नको प्राण. योद्धे असे शूर नाना.
निघाले घरांतून; आले वनांत.
रणीं सा लढूं, हेंच आहे मनांत. ५०

तान्हाजी तो; तो निलाजी निघाला.
नेताजी तो. येसजी शूर आला.
झाली गर्दी. चालले शूर रानीं.
तेव्हां राजा शूर आनंद मानी. ५१
वनीं आग लागे, तसा वीर चाले.
जुमानी न रानें, न गोंटे, न नाले.
पुढें वाघ येतां, करी ठार त्याला.
जसा पूर चाले, तसा शूर गेला. ५२

आले मुखोळ्य, अडवी नदी तों.
दोन्ही थडा पूर भरून जातो.
डोळा टिकेनाच नदी प्रवाहीं.
चाले अतोनात घटप्रभा ही. ५३
उडे केंमळ्या; जों चढे फार पाणी.
जमे फेस कांठीं, जणों शुभ्र लोणी.
उठे लाट एका वरी एक मोठी.
उठे नाद घों घों, घुमे फार कांठीं. ५४
कुठें घोळ आहे. फिरे पात्र मागें.
उठे फार भोरा. नदी लाल रंगें.
कडे भात जैसा, तसा घोळ वाहे.
कुठें जोर लागे. नदी चाललीहे. ५५
आहे कुठें शांत, जरा हले कीं.
पाणी झळाळे, उसळी विलोकीं.
कांहीं धडाडा डगरी उडाल्या;

पाण्यांत तेव्हां उलढून गेल्या. ५६
पाणी उडालें. वन सर्व म्यालें.
तेव्हां महावीर समोर आले.
तों वाहती वृक्ष नदींत भारी.
येतात ओंडे घसरून तीरीं. ५७
नदी चाललीहे; महापूर घाले.

सर्वें वाहती झैस. तों राय बोले:—
" मुधोळास आलों. पहा! विघ्न आलें.
महापूर. पाणी पहा! हें निघालें. ५८
करा युक्ति कांहीं, पडूं पार आतां.
पहा शत्रु तो पैल कांठास जातां.
उभे ते मराठे पहा! शत्रु कांठीं.
जमे पैल तीरीं, अहा! काय दाटी! ५९
मोडा झाडें; सांगडी थोर जोडा,
बांधा साली, वेल हे लांब तोडा.
वेलाचे ह्या दोर आतां वळारे.
सांधा, बांधा, शूर आहांत सारे. ६०
जरी भोपळे आज नाहींत. वीर!
फुगे धोतरांचे करा गोल थोर.
भरा आंत वारा. करा चौघडीला.
पुढें घट्ट बांधा फुगे सांगडीला. ६१
पोहूं चला: पार निघून जाऊं ;

टाका उड्या. शत्रु रणांत खाऊं.
आला पहा ! थोर रणप्रसंग.
योद्धे महाशूर कराल रंग. " ६२

असें बोलतां सिद्ध ते वीर झाले.
तयारी भरारां कराया निघाले.
पुढें सांगडी ह्या. उभे शूर वीर.
उड्या टाकल्या. शूर झाले समोर. ६३
कुणी काढतो वीर छाती, तरंगे.
कुणी हात मारी, मनीं फार रंगे.
उड्या मारतो शूर पाण्यांत भारी.
कुणी टाकतां झाप बाहू उभारी. ६४
करी" डुम्म " राजा; निघे फार वेगें.
मधें वीर आले; तसी धार लागे.
निघाले दमानें, असे ओढ जेथें.
उडे फार पाणी,मिळे ठाव तेथें. ६५
तळीं टेंक आहे, बुडालें जळांत.
तसा शूर सारा वळे ह्या नदींत.
दिसूं लागतीं मुंडकीं शत्रुला हीं.
मुधोळांत झाली तसी एक लाही. ६६
ते काव्हले, गर्क मनांत झाले

पाण्यांत राजा मग शूर बोले:—
" पोहून आलों हटवून; पूर.

धांवा चला शत्रु दिसे समोर. ” ६७
हर्हर्महादेव तसा उडाला.
योद्धा मराठा उसळून गेला.
तो वेग ! तें धैर्य ! मुधोळ भ्यालें.
मार्गे तसे घोरपडे निघाले. ६८
मराठें तसें सैन्य कांठास आलें.
खुली टांग, छाती, खुला दंड, चालें.
गळे थेंब थेंबा शरीरांत पाणी.
भरे शौर्य अंगीं. खुले फार पाणी. ६९
ते धावले शूर रणांत जेव्हां;
भ्याला मनीं घोरपड्याहि तेव्हां.
तर्वार चाले, उठली अरोळी.
तो शत्रु युद्धीं मग पाय गाळी. ७०
मराठे मराठे लढाया निघाले.
तरी शौर्य हें त्यांस नाहींच आलें.
सुटे वाघ जैसा तसा वीर चाले.

पुढें शूर तो काव्हकाव्हून बोले:— ७१
“ धांवा, हणा, कत्तलरे ! कराही.
योद्धा मुधोळांत कुणी न राही.
मारा, चला ! घोरपडे रणांत. ”
ऐसा शिवाजी चिडला मनांत. ७२
हें युद्ध झालें, हटलें मुधोळ.
जेव्हां गिळी घोरपड्याच धूळ.

तेव्हां महाराज ह्मणे " पुरेरे !
हा शत्रु हातीं. रण सार्थ सारें. ७३
हा गर्वरे ! घोरपड्या कशाला ?
हा मृत्यु आला. दम सर्व गेला.
बेशुद्ध कां रे ? सरला प्रपंच.
पांचांस आतां मिळतात पांच. ७४
योद्धे गड्यांनों ! धड न्या घराला.
आहे जरा जीव, करा त्वरेला.
वाडा मुधोळीं रमणीय आहे.
न्या शत्रुला ह्या तिकडे. पहा हें." ७५

नेती घराला मग शत्रु जेव्हां,
होती तिथें घोरपडीण तेव्हां.
कल्होळ मोठा उठला घरांत.
राजा शिवाजी मुरला मनांत. ७६
उभा राय आहे; पुढें प्रेत आहे;
मिठी बायको त्यास मारून राहे.
करी दुःख भारी. भियाला विलोकी.
पुढें दागिने काढकाढून टाकी. ७७
करी लाल डोळे, धरी हात पोटीं.
हणी ती कपाळा, सुटे केश पाठीं.
जरा पाय घांसी, शरीरास झोले.
पुढें सुंदरी ती रडे, सूक्ष्म बोले:— ७८

"सख्यारे ! प्रिया तुझ ! कां त्याग माझा
न तूं बोलशी. शब्द हा खास वांझा.
सखी लाडकी मी तुझी. कां नकोरे !
अरे बोलरे. काय गेलेंच वारें ! ७९
प्रारब्ध ! प्रारब्धच भोंवलें हें.
हा त्रास, संताप ह्मणून आहे.
देवा कशीं गायच नाडली ही !
पाहा सख्यारे ! मज गोड कांहीं. ८०
तूं शूर, तूं थोर, मला कळे कीं.
त्वां कीर्ति मोठी रचली त्रिलोकीं.
त्या वाळव्याचें रण त्वांच केलें,
तें शौर्य, चातुर्य कुठें पळालें ? ८१
नको अंत पाहूं सख्या बोल कांहीं.
तुला राग कांरे ! कशी प्रीति नाहीं !
तुझें रूप हें ! वार हा काय लागे !
किती रक्त हें! झीट येती मला. गे ! ८२

करी वस्त्र एकीकडे; वार पाही.
हणी ऊर भारी. करी एक लाही.
पुढें प्रेत आहे. धरी ओंठ त्याचा.
नसे हाल कीं चाल, नाहीं हि वाचा. ८३
तों पुत्र आला बडवीत छाती.
तोंडांत " बाबा " धड थोर हातीं.
देखे सखी, हंबरड्यास फोडी.

तो पुत्र उच्छ्वास मयाण सोडी. ८४
बाबा ! बाबा ! शब्द हा पुत्र काढी.
देवा ! देवा ! स्त्री ह्मणे केश ओढी.
शोकाचा हा लोळ चाले सभोंती.

तों स्त्री बोलेः—" काय हा देह ! माती.
हा पुत्र आला, बघ तूं पियारे !
रे ! लाड आतां स्मरशील सारे.
घ्यावें कडेला तुज. रे ! ह्मणावें:—
' दे ये मुका गोड. वनांत न्यावें. ८६
झेलोत हातांत उभें रहावें.
तूं बाळ, ते थोर, किती खुलावे !
ते पाहती जों मज, काय रंग !
देवा ! कसा हा गुजरे प्रसंग ! ८७
हाहा ! अहाहा ! बघ पुत्र. कींरे !
रे ! हास्य मुद्रा कर तूं पियारे. "

हे बोल काढी; मग भेत झांकी.
तेव्हां उडी पुत्र पुढेंच टाकी. ८८
" बाबा " ह्मणे पुत्र गळां पडे तों..
आई मुलाचा मग लोळ होतो.
आई ! बयेगे ! मुलगा ह्मणाला.
तोंडीं तिच्या दाटत फेंस आला. ८९
आली पुढें झीट पडे भुईला.

मारी मनीं तो मग पुत्र म्याला.
मारी मिठी मान धरून हातीं.
वेड्या प्रमाणें बघतो सभोंती. ९०
ह्मणे :-" बोल, आई! नको प्राण सोडूं;
नको फेंस काढूं; नको पाय झाडूं.
अगे बोल.. देवा करूं काय आतां!
कशी वाटं? गे। घाबरा प्राण होतां. " ९१
पुसी पुत्र डोळ्यांस. वारा हि घाली.
तसी देहभानीं सखी सूक्ष्म आली.
धरी मूल पोटास; उच्छ्वास टाकी.
पुसी तोंड तों शोक बाहेर फेकी. ९२
" शिवाजी कसा भोंवशी तूं मला! रे!
कसा घात केलास, हें दुःख सारें!
तुला लाज नाहीं. इथें कष्टशी कां!
कशाला रडें हें! मला आज ठोका. " ९३

अशी बोलली, तों खरा कंठ दाटे.
शिवाजी जळाला, मनीं शोक सांठे.
पुढें प्रेत, तो पुत्र, ती स्त्री, विलोकी.
न ज्यों आवरे शोक तों अश्रु टाकी. ९४

तेव्हां सुरू शोक करी, ह्मणाली:—
" कां गाळशी अश्रु उगीच गालीं!
हें कर्म केलेंस अघोर मांग!

आतां कशाला करतोस सोंग ! ९५
तूं चोर. तूं दुष्ट. लुटून लोक,
झालास मोठा, करतोस शोक.
तूं मानभावी कळलास पक्का.
देतोस सत्यास सदा हि धक्का. ९६
तूं नाडशी गौ मज सारखी ही.
थोतांड सारें. तुज लाज नाहीं.
घे सूड देवा ! धर मान. भूत !
रे चोर तूं कां करतोस घात ! ” ९७

राजा ह्मणे तों:-“उचला शरीर.
जाळा, चला. सज्जन शूर वीर.
आलों चला ! मी जलदी स्मशाना.
ह्या शत्रुला मित्र ह्मणून माना.” ९८
तें प्रेत नेतां उसळे तडाका.
बाबा ! सख्या ! ह्या उठतात हाका.
चाले शिवाजी. निघतात लोक;
जाळून त्याला करतात शोक. ९९
आले घरीं. घोरपडीण आहे.
राजा ह्मणेः- “ राज्य तुझें पहा हें.
हा बाळ राजा. जप तूं मुलाला. ”
तों बायको ती रडती घळाळा. १००
ह्मणे तीः- नको राज्य, आतां नकोरे.
तुझें राज्य हेंरे ! तुझें द्रव्य सारें. ”

म्हणे तों शिवाजीः- " तुझा पुत्र राजा.
असे हेंच प्रारब्ध, हा रंग ताजा. " १०१
केलें तिचें सांत्वन, वीर गेले.

आतां पुढें अंगण थोर आलें.
तों शिंग फुंकी मग शिंगवाला.
सारा महावीर समोर झाला. १०२
मैदान आहे. जमला मराठा.
ते स्वार, घोडे, रणरंग मोठा.
आले तिथें सर्व मुधोळवाले.
राजा शिवाजी मग शुद्ध बोलेः-१०३
"मुधोळवाले ! जमलेत बाबा.
ध्या चाकरी. योग्य तुझा घरोबा.
आहांत सर्दार हुशार सारे.
चला सुटूंद्या रणरूप वारें. १०४
जपेन. बाबा ! समजून राहा.
सुकीर्ति होईल. विचार पाहा.
रे आमची रीति जनास ठावी.
ही चाकरी शूर ! पहा करावी. १०५
हत्ती, तसे उंट समोर आणा.
हें आमचें सर्व असेंच जाणा.
हो स्वार, बार्गीर करा तयारी.
आला मराठ्यांस उदंड वैरी. १०६
तुम्ही भीति टाका. तुम्ही द्वेष टाका.

तुह्मी स्नेह राखा. तुह्मी शत्रु ठोका.
तुह्मी आमचे हे. तुह्मी हे मराठे.
पहा लागती एक॰पायास कांटे. १०७
वैरी मुसल्मान. पहा खरें हें.
सावंत त्यांना मिळतात रे ! हे.
झाले कसे हे लढण्यास सिद्ध ?
मारूं चला सर्व मिळून युद्ध. १०८
हर्हर्महादेव करा मिळून.
चाऊं चला सैन्य अर्धी जुळून."

हर्हर्महादेव तसा उडाला.
झाला खरा सिद्ध मुधोळवाला. १०९
ते बोलती:— "रंग मनांत आला.
सभाळ राजा शरणागतांला.
आह्मों मराठे लढणार शूर.
कोठें मुसल्मान टिकेल वीर !" ११०
चाले मराठा समजूतदार;
चाले शिवाजी रणरंगधीर.
सावंतवाडी दिसती समोर.
ही फौज चाले. सुटलाच पूर. १११
हत्ती, घोडे. चालली रांग मोठी.
मागें धांवे स्वार. तों हौस पोटीं.
तोफा मागें. ओढिती बैल त्यांना.
मोठी गर्दी. चालले वीर नाना. ११२

जागों जागीं थोर मैदान, ठाणीं;
वाहे जेथें हो ! नदी. स्वच्छ पाणी.
रानें कोठें डोंगरी. फिरे झाडी.
धांवे तेथें, बंदुकी वीर सोडी. ११३
रानीं निघालेत. शिकार चाले.
तेव्हां पुढें अस्वल, वाघ आले.
तर्वार हातीं चवताळले कीं;
तों एकटा वीर उडीच टाकी. ११४
तो वाघ, तो वीर लढे. विलोकीं;
तो वीर वाघास वनांत ठोकी;
कोणी धरी अस्वल, वीर आला.
कोणी धराया हरणें निघाला. ११५
असा रंग चाले; पुढें वीर गेले.
वनीं चालतां घाटमाथ्यास आले.

उभा घाट. लागे कडा. घोर घोल.
टिके पाय कैंचा ? दरा फार खोल. ११६
घळण, ओहळ, दाट जमे वन.
कठिण वाट, भयाण. भितें मन.
हळू हळू उतरे मग वीर तो,
अनुभवी दिवसा घन रात्र तों. ११७
मुरे लागले. घाट गेला. निघाले.

तसा हेर कोणीहि वाडींत बोले:—

" मुसलमान ठोकून आला शिवाजी.
मुधोळांत जाऊन तो शूर गाजी. ११८
असे फौज मोठी; असे त्वेष भारी;
असे वेग मोठा; रणाची तयारी.
निघाले मराठे, मनीं कान्हले ते.
मराठ्या मराठ्यांत हें युद्ध होतें. " ११९
वार्ता अशी देशमुखास जाळी;
तो पाय तेव्हांच भिऊन गाळी.
आतां ह्मणे " काय कसें करावें ?
नाहीं पहा शक्ति. रणीं मरावें. १२०
गोवें फिरंगी पळतां पहावें.
धावूं चला. निश्चय हा. निघावें. "
भ्याला. पळाला. मन दंग झालें.

वाडींत योद्धे लढण्यास आले. १२१
ती शून्य वाडी, यजमान नाहीं;
तो देश घेतां श्रमले न कांहीं.
नाकीं धराया निघती मराठे.
ते शूर घेती करभार हट्टें. १२२
ते गांव घेती, करती हुशारी.
तें राज्य हातीं; रमतात भारी.
राजा शिवाजी लढणार.शूर.
कामांत साऱ्या ठरला हुशार. १२३
नघाला शिवाजी; दरारा सभोंती;

फिरंगी भिती; आज थारा न देती.
तसा जेर सावंत आला; निघाला.
घरीं पोंचला, द्वेष सारा बिवाला. १२४
मग ह्मणे; " मज दान, कृपा करा.
शरण मी. रण राय! नको जरा.
बहुत सुंदर पाय इथें धरूं;
नजर गोड करा. मृदु लेकरूं. " १२५
बोले शिवाजी, " तुज भीति नाहीं;
अकीत सावंत सदा हि राही.
आह्मा मराठ्यांस सहाय हो. रे!
पाहा मुसल्मान हि कर्म सारें. १२६
तुला रे! कळे तो मुसल्मान कोण;
तुझे आमचे शत्रु, हें नीट जाण.
कधीं त्यास साहाय्य देऊं नको रे!
किती शूर आह्मी. मनीं जाण सारें. " १२७

सवें आज सावंत, राजा निघाला;
मनीं रंगला तो. सुखी शूर झाला.
पुढें रांगण्याला जसा पोंचला तो.
खुले फार राणी. महानंद होतो. १२८
आईस संतोष. मुलास मौज.
राणीस आनंद. वसंत तेज.
आली किती हौसहि चाकरांना!

तों कल्पना शूरजनांत नाना. १२९

कां ? हेर आला, ह्मणतो नृपाला.
तो बादशाहा उडतोय पाला.
कर्नाटकीं धांदल फार झाली;
तों बादशाही दचकून गेली. १३०
गेली जसी कीर्ति; मनांत ख्याली;
जों बंड माजे; परतून आली.
ख्याली पुन्हा फौज रणांत जेव्हां,
तो म्लेंच्छ मागें फिरलाच तेव्हां. १३१
गेला घराला, झुरला मनांत.
ऐसा रणाला तरला निवांत.
आतां नसे त्वेष; नसे हि शक्ति;
राजा ! नसे द्वेष, नसेहि युक्ति. १३२
मनीं स्वस्थ झाला विजापूरवाला,
तसा दूत राजा ! वनीं हा निघाला. "

पुढें जासुदानें दिलें पत्र हातीं;
कळे शाहजी आज भेटीस येती. १३३
संतोष राजास विचित्र झाला.
आनंद चित्तीं उसळून गेला.
फांकें घरीं तेज सुरेख भारी;
राणी कराया निघती तयारी. १३४
तों वृद्ध माता ह्मणती, " मुलाहे !

तीर्थांत काशी अति थोर आहे.
लोकांत रे ! उत्तम राज साजे.
तान्यांत हा सूर्य वरिष्ठ गाजे. १३५
गंगानदी थोर नद्यांत मान.
स्वर्गांत रे ! इंद्र विराजमान.
वाटे मला रे ! पति तेंवि. बाळा ?
आनंद. हे नंदन. हा उमाळा. १३६
तो डौल, तें रूप मनांत येतें;
रे ! दुःख माझें सगळें हि जातें."

जासूद आला, ह्मणतो," निघाले.
ते शाहजीराव शिवेस आले." १३७
राजा शिवाजी उठला त्वरेनें;
पायीं निघाला जलदी मजेनें;
होते सवें वीर खुशाललाहे;
चाले पुढें धांवत. रान आहे. १३८
सवें पालखी राय घेऊन चाले.
सवें शुभ्र चौऱ्या. सवें सैन्य आलें;
सवें दोन हत्ती हि. स्वारी निघाली.
दिसे शाहजी तों उडी राय घाली. १३९
ते भेटले सुंदर बापलेक.
आनंद भारी करतात लोक.
तों शिंग फुंकी मग शिंगवाला.
"हे राय हे राय" सुनाद झाला. १४०

झाली दुतर्फा मग फौज सारी.
तो पालखी सज्जन शूर घेरी.
तो शाहजी सुज्ञ बसे, विलोकी.
राजा धरी पाय सुरेख लोकीं। १४१
उठवितां मग पुत्र, ह्मणे पिताः—
" बहुत मान. पुरे. उठ." बोलतां
झटकनीं उठलाच, उभा पुढें.
नमत लाजत. तेज किती चढे ! १४२
जोडी पुढें हात ह्मणे, "चढावें.
ही पालखी, वीर सर्वे असावें."
पायीं निघे शूर धरून चौरी,
तो राज चौरी मग छान वारी. १४३
ह्मणे शाहजी "रे ! नको आज चालूं".
तसा शूर बोले, "अशी रीति चालू."
करी शाहजी तों किती आग्रहाला;
तरी शूर पायीं निघे तो घराला. १४४
आतां दुतर्फा मुजरा उडाला.
" हे राय हे राय" सुनाद झाला.
ती पालखी थोर मधून चाले.
हातांत चौरी मग राय बोले. १४५
"घडे आज सेवा, असें पुण्य मोठें.
निघे श्रावणासारखा याच वाटे.
तसा पुत्र व्हावें, मनीं वाग्तें हें.
तरी पुण्य केलें नसे. खास आहे." १४६

ती फौज पाही; जन सर्व पाही.
हातांत चौरी रणशूर वाही.
झाला किती नम्र नवर्णवें कीं.
ही रीति·चाले विरळाच लोकीं. १४७
दारीं तिथें अंथरले रुमाल;
ती पालखी तों उतरे खुशाल.
राजा धरी सोज्वल शाहजीला,
चाले पुढें. नाचत शंभु आला. १४८
धरी थोर आजा मुलाला मजेनें;
मुका गोड घेतो पुढें तो त्वरेनें.
इथें चोर चोरून राणी विलोकी.
तसी वृद्ध माता दिसे गोड लोकीं. १४९
बसे सुज्ञ आजा. पुढें शंभु आहे;
उभा शूर राजा, मनीं भीति राहे.
जरा बाजुला आड ती सूक्ष्म राणी.
तसी वृद्ध माता हि पाण्यास आणी. १५०
आनंद मोठा भरला घरांत;
पायास राजा रगडी निवांत;

तो शाहजी सुज्ञ सुरेख बोले:—
" हें भाग्य माझें, सुख हें मिळालें. १५१
हा पुत्र माझा रणरत्नशोभा;
ही सून माझी दिसतीच रंभा. "
येती तसी सून, नमून बांके.

पायां पडे. तेज विचित्र फांके. १५२
डोळे तिचे भव्य, सुरेख भाळ,
झाली उभी. सुंदर काय डौल !
पायां पडे कीं फिरती झरारा;
ओंचा धरी शंभु, करी पसारा; १५३
मुरडती, फिरतां हिसका हणी;
पदर ती धरतो मग शाहणी.
जलदिनें निघतां हसली जरा.
बहुत झोक दिसे मग साजरा. १५४
तों वृद्ध माता खुलली मनांत.
राजा शिवाजी रमला घरांत.
आनंद झाला बहु शाहजीला.
राणी खुले, शंभु पळून गेला. १५५

ह्मणे शाहजी, "कीर्ति केली मुला तूं!
तुझें शौर्य गाजे. न कांहींच कितू;
तरी हे मुसल्मान घेतील सूड;
जळे फाजिला भ्रांति तूं सर्व सोड. १५६
नेली कुणी सुंदर नूरजानी,
हा जीव तो व्यर्थ ह्मणून मानी.
येईल केव्हां मग शत्रु पाहा.
आतां तरी शूर हुशार राहा. १५७
तो बादशाहा ह्मणतो मनांत,
योद्धे मराठे करतात मात.

जेव्हां मुला संधि मिळेल त्याला,
तेव्हां पहा म्लेंच्छ हणील ढोला. १५८
तुला काय सांगूं ? जुन्या काळचा मी.
तरी जीव हा राहतो कां निकामी !
मुधोळांत झाली जरीरे ! लढाई,
तरी ते मराठे. नको फार घाई." १५९
बोले शिवाजी बहु नम्र भावें,
"छाया करी वृक्ष सदा स्वभावें.
ठावें मला काय ? विनोद कां हा ?
मी मूल, मी दास. वडील आहां." १६०

बहिर्जी ह्मणाला, " महाराज ! पाहा.
नसे रांगणा थोर किल्ला खरा हा.
सवें माणसें; सूक्ष्म राणीहि आहे.
सवें शंभु; माता सवें सुज्ञ राहे. १६१
इथें राहणें हें रुचेना मनाला.
कधीं घात होणार ठावें कुणाला ?
असे मित्र सावंत या कोकणांत.
तिथें रास आहे. इथें कां कणांत ? १६२
जाऊं चला रामगडास राया !
झाल्या लढाया. मग शांत व्हाया.
हीं माणसें सर्व थकून गेलीं
विश्रांति त्यांनां न मुळीं मिळाली. १६३
हे पाहुणे थोर घरास आले;

राजा ! इथें कां जर युद्ध झालें.
वृद्धास संताप, घरांत भीति,
ही योग्य वाटे तुज्ञ काय रीति ?" १६४

बोले शिवाजी समजून सारें,
" जाऊं चला रामगडास कीं. रे!
वा रे ! बहिर्जी ! खुनशी खरा. बा !
तो डाव साधून असा घरोबा." १६५
ह्मणे सुज्ञ माता. " जसा तो पिलाजी,
तसा शूर तूं थोर. बाबा ! बहिर्जी !
तुझें शौर्य, चातुर्य, ठावें मला. रे !
तुह्मी शूर दोघे जणों काय वारें." १६६

बोले बहिर्जी, " मज राग नाहीं,
रागें भरी बाप मुलास कांहीं.
आहे पिलाजी रणशूर वीर;
मी काय आहें मग त्या समोर." १६७

राजा ह्मणे, " फार विनोद झाला.
जाऊं चला रामगडास; बोला."
झाली तयारी निघतात वीर.
आले महावीर नृपा समोर. १६८
घोडे किती ! उंट किती निघाले !
ह्या पालख्या. राठ भुई हि आले.

माता बसे. सुंदर पालखी ती.
शंभूस मांडीवर आज घेती. १६९
राणी निघाली. खुलतोय मेणा.
योद्धा पिता वृद्ध जसा ससाणा.
घोड्यांवरी सुंदर बापलेक.
बाजूस चाले मग वीरलोक. १७०.
घाटांत खांद्यावर बैसले ते.
आतां जनांला सुख फार होतें.
आनंद चित्तीं, रमले मनांत.
मैदान लागे. वन सर्व शांत. १७१
डेरा दिला. फौज पडून राहे.
मागें पुढें डोंगर रान आहे.
तीं पर्वतांचीं शिखरें निघालीं;
गेले कडे उंच किती अभाळीं। १७२
दरे खोल मोठे. दऱ्या त्यांत फार.
किती दाट झाडें। पडे अंधकार.
कुठें टोंक बाहेर आलें समोर.
कुठें अंत नाहीं. असे रान घोर. १७३

ह्मणे थोर तो शूर देशाभिमानी,
"करूं आज, आई! इथें मेजवानी.
महासुज्ञ, आई! घरीं वृद्ध आले.
करूं आज सेवा." पुढें राय चाले. १७४

आले शिकारी ! वन घोर लागे.
बंदूक हातीं बघती न मागें.
जाती सभोंती उठवीत रानें.
तों श्वापदें तीं पळती भयानें. १७५
कुणी वाघ आला पुढें, ठार केला.
शिरे तो पुढें वीर तेव्हां, न भ्याला.
तसीं आसलें दोन आलीं धळींत;
हणी शूर दोघांस एका उडींत. १७६
जिथें फार ती झाड होती कटारी,
ससे छान होते तिथें उंच भारी;
चढे शूर तो चोर चोरून राय.
उडी धाड टाकी; रुते घट्ट पाय. १७७
झुके अंग तेव्हां; टिके पाय कैचा ?
तरी आंवरी झोक योद्धा स्वतांचा.
धरी शूर नाकें, हणी त्यां सशांला
ससे सर्व पाठीस लादून आला. १७८
पक्षी किती सुंदर ठार केले !
घेऊन हातीं मग वीर डोले.
सारे निघाले; फिरले घराला;
तों शाहजी मुञ्ज ह्मणे भियेला. १७९

"गेला कुठें सुंदर मूल आतां ?
आनंद गे ! बोलत काळ जातां.
नाहीं कुठें तो. करितीस काय ?

शोभे तुझा हा रमणीय काय." १८०
बोले पुढें सुज्ञ पतिव्रता ती.
"केलें अहा। कौतुक. काय कांति !
'आतां करूं सुंदर मेजवानी;'
बोले पहा ! पुत्र, असून रानीं. १८१
गेला कुठें तो नकळे कुणाला;
हा त्रास होतो बहु या मनाला.
तो शूर, तो गोड समोर येतो.
तो इंद्र, तो चंद्रचि भास होतो." १८२

ह्मणे शाहजी, "शौर्य भारी मुलाचें;
भितो देश सारा. मराठे न कच्चे.
जिथें पाय ठेवी, तिथें युक्ति लावी,
करावें कधीं युद्ध; ही वेळ ठावी. १८३
पळे शत्रु कीं, गे ! वळे हा मराठा;
निघे देश हा फार पेटून हट्टा.
रणीं युद्ध झालें, घरीं राज्य आलें.
महापुत्र. गे ! थोर चातुर्य केलें. १८४
हे ईश्वरा ! शक्ति तुझी विचित्र.
र धांव. रे ! पाळ परेश पुत्र.
त्वां ईश्वरा ! कीर्ति जनांत केली.
सौख्यें अशीं हीं मज रे ! मिळालीं." १८५

आनंदानें सुज्ञ माता ह्मणाली,

"आहे योद्धा थोर. ही कीर्ति झाली.
येतो माझा पुत्र. हा चंद्र पाहा,
हातीं त्याच्या श्वापदें हीं. अहाहा !" १८६
पेती पुढें माय अलाबला ती.
आला इथें राय, शिकार हातीं.;
शोभा चढे; तेज वनीं झळाळे;
आले शिकारी, चढलेत डोळे. १८७
बंदूक खांद्यावर गुंग, जंगी.
अंगास पाला नटले प्रसंगीं.
झाडें जणों हे; दिसले वनांत.
तीं श्वापदें तों न भितीं मनांत. १८८
अंगास पाला; रणशूर आला.
हातांत भाला, बहु तृप्त झाला.
बंदूक खांद्यावर राय बोले,

"आई ! वनीं सौख्य उदंड झालें. १८९
घे श्वापदें हीं. कर मेजवानी.
सारी तयारी करतोच रानीं.
होता तिथें उंचवटा वनांत,
तांबूस तांबूस मुरूम त्यांत. १९०
उगवली हिरवी हरळी तिथें,
गवत सुंदर दाट जमे जिथें,
झुळझुळे जळ. पाट पुढें असे,
मग जरा गवतांत दडे, दिसे. १९१

पाणी मजेनें फिरतें वनांत.
आहे सभोंती वन सर्व शांत.
जागीं फुलें ह्या उठलीं विचित्र.
ते रंग त्या इंद्रसभेस पात्र. १९२
किती लाल होतीं ! किती शुभ्र होतीं !
गुलाबी किती तीं। कुसुंबी किती तीं !
कितींला तुरे ! गोल गोंडे कितींलीं !
किती कर्णरूपी ! किती लांब माला ! १९३
ती पाडली, लाहनशी सुरू कीं,
तो पांढरासा कुरडू विलोकीं.
तो शोभतोहे चिका-तिरंगी.
तो पांढरा शंकर, हार अंगीं. १९४
विष्णुक्रांता तांबडा रंग आहे.
मध्यें मध्यें ती दुधाणी हि राहे.
पत्रें नामी. शोभली ती गुलाली.
तेव्हां रानीं लाजरी धीट झाली. १९५

ठिकाणीं अशा राय पात्रांस मांडी.
पुढें स्वच्छ पाणी. वनीं हींच भांडी.
असा रंग झाला. असा थाट केला.
मनीं शाहजी फार संतुष्ट झाला. १९६
हातीं सखी सूक्ष्म पदार्थ घेती;
ह्या अंगणीं सुंदर आज येती.

तों तेज फांके, रमणीय कांता.
वाढी मजेनें, वळणांत आतां. १९७
हीं मांडलीं सुंदर लांब पानें.
तों शाहजी शूर बसे मजेनें.
बाजूस योद्धे बसताब सारे.
रानीं सुटे शीतळ मंद वारें. १९८
ते घास तोंडीं मग घालणार;
आला पिलाजी लढणार शूर;
तों नूरजानी दिसली समोर;
तें रूप, तो रंग सुरेख फार. १९९
"ये ये पिलाजी" ह्मणतो शिवाजी.
"ये बैस बाबा! श्रमलास, गाजी!
ही नूरजानी हि वनांत आली,
त्वां गोष्ट ही आज विचित्र केली. २००
बसूं दे तिला दूर डेऱ्यांत, पाहा!
नको भीति मानूं, मनीं स्वस्थ राहा.
पिलाजी गड्या! जेव. घ्या घास आतां."
तसी वाढती सुंदरी नम्र कांता. २०१
पुढें जेवतांना मनीं तृप्त झाले.
हळू शाहजी तों महासुज्ञ बोले:—
"मुला खास तूं सुज्ञ आहेस मोठा.
तुला ठावका सर्व मोळा मराठा." २०२
राजा शिवाजी ह्मणतो पुढें तो:—
" आनंद माझ्या त्दद्यास होतो.

सेवा अशी ही घडली करांनीं,
हें आचरावें बहु लेकरांनीं." २०३
संतोष राजास विचित्र झाला.
पानें सुपारी. मग थाट केला.

रानांत झाडें. रमणीय छाया.
आनंद येथें बसले कराया. २०४
बोले पिलाजी मग वीर जगी,
"गाणें करावें असल्या प्रसगीं.
गाणार ती सुंदर नूरजानी;
आणा तिला कीं. भरली जवानी." २०५
घेऊन अंगावर शालजोडी,
आली पुढें आज, नभीति सोडी.
तों कांति दाटे रमणीय फार.
झाकून ती तोंड बसे समोर. २०६
तों नूरजानीः—"मज आज सोडा.
लोकांत योद्धेजन कीर्ति जोडा.
मी दासदासी. मिळवाल पुण्य.
देईल कीं साक्ष पहा! अरण्य. २०७
बोले पिलाजी, "करशील गाणें,
तेव्हांचे एथून घडेल जाणें."
तों नूरजानी ह्मणती. "पहा हें.
सेवेंत मी तत्पर खास आहें. २०८
वीणा नसे कीं तबला नसे कीं,

गाऊं कसी आज अरण्यलोकीं." ?

कोणी उठे उत्तर तीस द्याया,
"हें तोंड गे ! सिद्ध मृदग व्हाया. २०९
मी आज एथें धरणार ताल.
राजापुढें तू मग गा खुशाल."
काढी जहिर्जी मग अलगुजाला.
मी सूर देणार. पहा मजेला. २१०
बसे नूरजानी, हणी उंच तान.
तसा डोलवी वीर तो फार मान.
चढे गात गातां, मिळे ती सुराला.
तसा ताल देणार आला भराला. २११
तों भैरवी गोड मनास लागे.
अंगांत तारुण्य, सकाळ वागे.
आकाश तेव्हां चमके विचित्र.
काढील तें सुंदर कोण चित्र ? २१२
ढगें दाट होतीं. दडे सूर्य त्यांत.
दिसेना कुठे बिंब. आकाश शांत.
असे तेज फांके, मधें तों अभाळीं
जणों सूर्य मारी ढगांच्या कपाळीं. २१३
लोंडा फुटे. तेज फुटे, झळाळे.
आकाश तों सर्व मढून गेलें.
तेव्हां अभाळीं किरिणें उडालीं.
गाण्यास ही मौज सहाय झाली. २१४

पुढें गोड गाणार गाती तराणा.
मनीं तृप्त झाला महाराज दाणा.
ह्मणे तो "नको. नूरजानी.पुरे गे !
घरीं स्वस्थ जा. घे पिलाजीस संगें. २१५
नको दुष्ट कर्में करूं तूं कधीं. हां !
नको चोर योजूं. घरीं स्वस्थ राहा.
मनीं खूष झाली. तसी ती निघाली.
उभी राहिली. तों करी मान खालीं. २१६
ह्मणे शाहजी " कोण ही ? सांग. बारे !
तसा सांगतो तो पिलाजीच सारें.
तसें शूर वृद्धास आश्चर्य झालें.
पुढें शूर राजाहि मंजूळ बोले.— २१७
" योद्धा पिलाजी लढणार शूर !
अंगीं किती हे दिसतात वार.
केला कुठें त्वां रणरंग थोर ?
रे ! सांग योद्ध्या ! रणरंगधीर ! २१८
नसे वार पूर्वीं. नसे एक खूण.
भरे अंग आतां. कळों दे दणाण.
कुठें युद्ध केलें ? कुठें शौर्य केलें ?
कुठें वार हे सर्व लागून गेले ? २१९
बोले पिलाजी रणशूर वीर—
" ते शत्रु आलेच रणीं समोर.
होती सवें ही रमणीय नार.
वैरी, मराठे लढतात फार. २२०

तर्वार चाले रणशूर भाला,
खिंडींत ह्या घोर अकांत झाला.
बाजी निघाला लढण्यांत दंग.
राजा ! तिथें ह्या घडलाहि रंग " २२१
कळे वृत्त राजास. संतोष झाला.
ह्मणे, " शूर शाबास " तों वीर गेला.
सवें नूरजानी, निघाला पिलाजी:
मनीं सर्व ते वीर झालेत राजी. २२२
आनंद पोटीं, त्हदयांत धीर.
आला शिवाजी वडिला समोर.
तो हात जोडून उभा. ह्मणाला.
" संतोष माझ्या त्हदयास केला.२२३
आज्ञा मला रामगडीं निघाया,
हे वीर, हें सैन्य, सवें असाया.
झाले उभे ते मग वीर सारे.
गेले झरारां, जणु काय वारें. २२४
गेले पुढें, वाट समोर चाले.
झाडी, तसे डोंगर थोर गेले.
तों पांच कोशांवर वाट झाली;
मोठ्या पुढें रुंद नदीस आली. २२५

मोठ्या शिळा अंथरल्या सभोंती.
गोट्यांत गोटे. उतरंड होती.
झाड्यांत झाडें अडकून गेलीं.

मांजे महारण्य. नदी निघाली. २२६
होती शिळा मोर्चेंबुरूज उंच.
मागें तिच्या डोंगर चार पांच.
डोळा न राहे. मन गुंग झालें.
ते वीर तों धांवत सर्व आले. २२७
वळण फार असे. जळ चाललें.
गगनचुंबित वृक्ष उभे भले.
पसरले करवंद तळीं जिथें,
कुरण दाट पुढें पडलें तिथें. २२८
वनीं चाललें पात्र मोठें झपाटें.

नदी पार होण्यास आले मराठे.
स्त्रिया रम्य होत्या. महावीर होते.
तिथें थोरलें रत्न दृष्टीस येतें. २२९
बहिर्जीस जी भेटली स्त्री वनांत.
बसे गारुडी तो जसा आगरांत.
मुसल्मान कोणी तिला ओढतोहे.
तसी सूक्ष्म ती स्त्री सभोंवार पाहे. २३०
केली विरानें सुटका क्षणांत.
आणा कथा ही सहजा मनांत.

•

लागे मनाला चटका तिच्या कीं,
हा गारुडी कोण विचित्र लोकीं. २३१
योजी मनीं दारुणशा पणाला.

बोले सखी सुंदर आपणाला:—
"हा गारुडी, हा पति मी करीन.
हिंडून रानीं जन हा धरीन. २३२
जरी गारुडी तो, तरी रूप नामी.
कुणी थोर योद्धा, नव्हे तो निकामी.
दिला देह ज्यानें, मिळो देह त्याला.
पहा लग्न झालें, मला तो मिळाला." २३३
तो वीर माझ्या त्द्दयांत आहे.
तो जीव, हा देह मिळून राहे.
आहे कुठें बाह्य शरीर त्याचें ?
शोधून काढीन वनांत साचें. २३४
हा देह त्याचा नलगे जगाया.
तो वीर कोठें मिळतो बघाया ?

हा रंग; ही प्रीति मनांत माजे.
पोटीं उमाळे फुटतात ताजे. २३५
राणी जसी सुंदर पात्र न्हाळी.
तों शोभली सोज्वळ रानजाळी.
आहे उभी स्त्री रमणीय कोणी.
लावण्य, तें रूप, विलासखाणी. २३६
लाजेल सीता बहुरूप साजे.
अंगांत शोभा असली विराजे.
गेली तिच्या सूक्ष्म समीप राणी.
डोळ्यांत ती सुंदर अश्रु आणी. २३७

तों सोयरा ही तिज गोड बोले.
"तूं सुंदरी कोण ? मनांत आलें.
आलें पुढें, उत्तर एक बोल.
देवांगने ! कांति तुझी अमोल. २३८
सहज तूं बसशी जलदेवता.
जवळ थोर नदी. रमशी स्वतां.
वन तुलां अतिरम्य मिळे जरी,
मज सवें तिकडे चल सुंदरी." २३९

ते मोकळे केश सुरेख सारे.
अंगांत चोळी नव्हती. अहारे !
गुंडाळलें कीं लुगडें शरीरा.
तें अंग शोभे, सुटतांच वारा २४०
नसे दागिना, कीं नसे वस्त्र मोठें,
नसे तीस जोडा. मनीं दुःख साठे.
कुठें गारुडी तो ? कसा प्राप्त होतो ?
नदी आड आली. पुढें कोण येतो ? २४१
करूं काय आतां ? इथें कोण आले ?
किती स्वार घोडे ! कुठें हे निघाले ?
मनीं दंग झाली; पुढें फार भ्याली.
उभी ती पुढें स्तब्धशी मूर्ति झाली. २४२
करी म्लान चर्या, शरीरास कांप.
जुळी हात दोन्ही, भरे तीस धाप.
उठे रंग तोंडीं, सुटे घाम अंगीं.

पुढें बोलली ती सखी ह्या प्रसंगीं. २४३
"मला दुःख भारी. विचारूं नका. हो!
वनीं वास माझा. वनीं देह राहो.
नका हो! धरूं. मी मराठीण आहें.
तुह्मी थोर. पायां पडूं मी? पहा हें." २४४
गहिवरे मग सोज्वळ सुंदरी.
उसळलें बहु दुःख तिच्या उरीं.
धडधडां धरणीवर ती पडे.
घळघळां फुटलें नयनीं रडें. २४५
राणीस तों दुःख उदंड झालें.
प्रारब्ध हें काय समोर आलें?
आलें रडें, तों ह्मणती, "नको गे!
आतां पुरे. गे! चल आज संगें." २४६
राणी बोले. चालला रंग जों हा,
कोळी आले. गाजली एक "हा हा."
आले कांठीं. नाव तों सिद्ध झाली.
सारी सेना पैल कांठास गेली. २४७
तो शाहजी सज्जन; सुज्ञ माता;
नावेंत दोघे चढलेत आतां.
राजा शिवाजी ह्मणतो प्रियेला.
"ये ये बसाया, बहुकाळ गेला." २४८
राणी तसी गुंग मनांत झाली.
ऐकून ती हाक सखी निघाली.
तों सुंदरी ती मग आड गेली.

कोळी पुढें तों मग नांव घाली. २४९
योद्धा उभा दोर धरून हातीं.
हा गारुडी तो, स्मृति तीस होती.
तें रूप, तो डौल, मनांत आला.
ते दंड, छाती. पति तो मिळाला. २५०
धांवे सखी, तांतड फार अंगीं.
टाकी उडी ती असल्या प्रसंगीं.
मोठी नदी ही. तिज भीति नाहीं.
पाण्यांत तेव्हां शिरली सखी ही. २५१
गटकळ्या मिळती. जळ खोल तें.
गडबडां फिरतां मग बोलतेः—
"पति तुला वरला. निघशी कुठें ?
ह्रदय हें बघ ! सुज्ञ सख्या ! फुटे. २५२
देखे बहिर्जी. बहु दंग झाला.
टाकी उडी तो. उठला, निघाला.
वेगें महावीर समीप गेला.
हातांत त्या स्त्रीस धरून आला. २५३
पोहून नावेवर तीस घेतो.
आनंद लोकांस विचित्र होतो.
आहे उभी ती रमणीय नार.
आहे बहिर्जी हि तिच्या समोर. २५४
ही सूक्ष्म नारी मग हें ह्मणाली.—
भार्या तुझी ही तुजला मिळाली.
केला किती शोध ! दमून गेलें.

ही मूर्ति पाहूनच तृप्त झालें." २५५
राजा, राणी, वृद्ध मातापिता तीं.
आतां ऐसें देखतां दंग होती.
आली नारी. भीति गाजे मनांत.
हिंडे रानीं. योजिला शूर कांत. २५६
"आश्चर्य" ! योद्धेजन हें ह्मणाले.
देवांगने ! कौतुक थोर केलें.
हा ! हा ! बहिर्जी ! अतिरत्न शोभे.
कां ही कृपा ? बोल सुरेख रंभे. २५७

चिकटलें भिजतां लुगडें जसें.
सुतनु ती सुकुमार किती दिसे !
जणुं उभी पुतळी, जणुं चित्र कीं.
अवयवें दिसती मृदु बोलकीं. २५८
तिचे मोकळे कैश. थेंबे गळाले.
तिच्या सूक्ष्म पाणी शरीरीं झळाळे.
खुले तेज अंगीं, सखी नम्र झाली.
करी गोड मुद्रा. पुढें ती ह्मणाली:— २५९
असे शूर योद्धा जसा गारुडी हा,
तसी आज देवांगना मी. अहाहा !
जसा गारुडी हा'मनीं मंत्र घाली,
तसी माळ घालूं सखी ही निघाली." २६०

राजास ही खूण मनीं मिळाली.

तों नाव·चाले. जलदी निघाली.
लाटांवरी लाट दिसे सभोंती.
मागें जणों डोंगर थोर जाती. २६१
बोले शिवाजी "वर सुंदरी ही.
ही भीति बाबा ! समजून राही.
केला तिनें त्याग पहा ! घराचा.
ठावा तिला झोक तुझ्या मनाचा. २६२
बोले बहिर्जी "नशिरेहि लक्षी.
मी पाहिली ही, इतकेंच साक्षी.
आज्ञा जरी ही; वरतों स्त्रियेला."
बोले सखी, "निश्चय ठीक केला." २६३
बहिर्जी पुढें हा जरा बोलणारा.
मधें स्त्रीच बोले. असा रंग सारा.
नसे धीर कांहीं. मनीं भीति गाजे.
बहिर्जी, सखी, गोड जोडा विराजे. २६४
कांठास तेव्हां मग नाव आली.
ती मंडळी शूर कडेस गेली.
होतें तिथें झाड. सुरेख छाया.
आनंद योद्धे बसले कराया. २६५
बसे शाहजीच्या पुढें तो शिवाजी.
जरा बाजुला शूर होता बहिर्जी.
सखी, सूक्ष्मराणी, तसी वृद्ध माता,
तिघी त्या उभ्या राहिल्या गोड आतां. २६६

म्हणे शाहजी, " ही असे कोण नारी.
कुठें ? गारुडी कोण ? कां तीस भारी !
मनीं फार आश्चर्य होतें मला. रे !
कथा सांग सारी. कळूं देच सारें." २६७

म्हणे तो शिवाजी "निघे हा बहिर्जी.
फिरे फार रानें. असे शूर गाजी.
बने गारुडी. कीं वनें सर्व पाही.
तिथें भेटली ही. नसे अन्य कांहीं. २६८
तिला त्रास होतां, करी मुक्त शूर.
तिला गोड वाटे मनीं थोर वीर."
म्हणे शाहजी. " ही खरी गोष्ट आहे.
हिचा बाप कोठें ? कुठें माय राहे ? २६९
पुसावें ! अधीं हें. पुढें लग्न लावा.
कुळी, गोत रे ! जात लक्षांत ठेवा."
असे ऐकतां बोल हे घाबरे ती.
अधीं फार भ्याली ? पुढें शांत होती. २७०
बोले बहिर्जी. " कुळ, गोत बोल.
तें थोर. हें रूप जसें अमोल.
लावण्य आहे गुण थोर. राया !
सामर्थ्य झाला कुळ गाजवाया." २७१
बोले सखी, "मी पति आज केला.
आज्ञा तुझी ही मज बोलण्याला.
वंदून आज्ञा तुज शोभवीन.

आयुष्य सारें चरणां भजीन. २७२
असे गोत माझें किती थोर बोलूं ?
मनीं दुःख आणूं ? कसें चित्त सोलूं ?
कुणी कोकणीं शूर पोवार होता.
महाकीर्ति त्याची. किती थोर सत्ता ! २७३
मुसलमान येऊन मारून गेले.
मुसलमान हो ! बंधु माझेहि केले.
उरे एकटी सुज्ञ आई, पुढें तों
निघे, देश त्यागी. मनीं त्रास होतो. २७४
त्यजी प्राण आई. नसे सौख्य कांहीं.
मला त्रास भाजी. मला बंधु नाहीं.
कथा सर्व ही बोलली थोर आई.
ह्मणाली मला- 'योज गे ! तूं शिपाई. २७५
ज्याला असे शौर्य; न भीति ज्याला;
ज्याची पुढें चाल धरून भाला;
ज्याला नसे त्रास; वनांत रंगे;
तूं योज ऐसा नवरा मुली गे." २७६

पुढें थांबतां शाहजी वृद्ध बोले.
" तुझें सांगणें सत्य. हें वृत्त झालें.
मला ठावका शूर पोवार होता.
करा लग्न बाबा ! कळे गोत आतां. २७७
असे मित्र पोवार माझा खरा कीं.
पडे संकटीं तें घराणें विलोकीं.

तरी मित्र मी दान कन्या करीन.
जुना थोर संबंध हा जोडवीन. २७८
ठावी मला सुंदर मूल. हाहा !
ये बा! बहिर्जी, नवरीस पाहा.''

तों शाहजी शूर उगाच राही.
योद्धा बहिर्जी मन तीस वाही. २७९
नदीतीर आहे. उभे वृक्ष थोर.
दिसे सांज. तो सूर्य आहे समोर
पडे शांत छाया. खुले रान सारें.
दिसे लाल तें बिंब. तें मंद वारें. २८०
मध्यें तिघी त्या बसती स्त्रिया, तों.
योद्ध्यास आनंद विचित्र होतो.
आहे बहिर्जी रणशूर वीर.
त्याच्या पुढें ती रमणीय नार.२८१
तों बाजुला शूर उभा शिवाजी.

तो शाहजी वृद्ध मनांत राजी.
बोले पुढें. ''साक्ष नदी असे ही.
हा वृक्ष, हा पर्वत, सर्व पाही. २८२
हा सूर्य, हा वायु, मनांत आणा.
हें लग्न, हा निश्चय, नीट जाणा.''
आनंद पोटीं उठला विरांच्या.
बोले बहिर्जी मग शुद्ध वाचा. २८३

" मी दास; दासीच सखी पहा. हो.
राजा शिवाजी बहुत्तम राहो.
सेवा तुझी सिद्ध सदा कराया.
रे ! जन्म सारा झटणार राया." २८४
हातीं धरी ती. सुकुमार वांके.
लावण्य, तें रूप, किती झकाके !
आनंद भारी, फुटले उमाळे.
तेव्हां बहिर्जी सुकुमार बोले:— २८५

" सखेहे ! प्रियेगे ! पति मी तुझा कीं.
भार्या तसी तूं रमणीय लोकीं.
राजा धनी सोज्वळ, दास हा मी.
मी हा, सखे ! तत्पर शूर कामीं. २८६
दासी तसी तूं, समज स्वतां हें.
राणी महासुज्ञ धनीन आहे.
सेवेंत ह्या तत्पर राहशील.
आनंद चित्तें सुख भोगशील." २८७
जोडून हातांस उभी सखी ती.
चोरून पाही मग ती सभोंती.
ती हास्यचर्या करतां ह्मणाली.
"आज्ञा मला सुंदर गोड झाली." २८८

चाले पुढें रामगडास सेना
आनंद झाला अति ह्या विरांना.

जासूद तो रामगडास जातो.
सांगे "महाराज ससैन्य येतो. २८९
सावंत, सर्दारहि, मायबापें.
वैरी तसा दुष्ट मनांत कांपे.
लोकांस आनंद विचित्र झाला.
सर्वांत हें स्थान रुचे नृपाला. २९०
सामोरे तों सुज्ञ मोरे निघाले.
आनंदाचा पूर चित्तांत चाले.
दुलूने तेथें सुज्ञ सर्दार होते.
प्रेमा मोठा. गांव बाहेर येतें. २९१

पुढें भेटले शूर राजास जेव्हां
तसे बोलती नम्रभावेंहि तेव्हां:—
"महाशूर हे राज! सेवेंत आह्मीं
तुझा राज! आह्मावरी लोभ राहो." २९२
बोले शिवाजी "सुखरूप बारे!
हे मित्र हो! वीर खुशाल सारे?"
तो शिंग फुंकी मग शिंगवाला.
आनंद सर्वांस अमोल झाला. २९३

शोभा किती रामगडीं निघाली!
ती दाट झाडी चमकून गेली.
आकाश शोभे. वर चंद्र होतो.
ह्या डोंगराला बहुरंग येतो. २९४

इथें स्वस्थ राजा. इथें स्वस्थ राणी.
पिता वृद्ध राजी मनीं शांति आणी.
तसी सुज्ञ माता महानंद मानी.
करी फार सेवा बहिर्जी इमानी. २९५
कांता पुढें ती सुकुमार येती.
सेवा कराया. मग सिद्ध होती.
राणी तिचें प्रेम मनांत आणी.
दोघी जणी थोर विलासखाणी. २९६